# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 16/06/2020 (मंगळवार)
(दुपार)

### अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. बेला :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील खापरी व मुरादपुरचे रोडवर 3 नंबर पुलाजवळ येथे दिनांक 15/06/2020 चे 10:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रोशन फुलचंद बोटरे, वय 25 वर्ष, रा. सुराबर्डी ता. उमरेड व त्यांचे वडील नामे– फुलचंद सदाशिव बोटरे, वय 54 वर्ष हे दोघेही बेला येथे जात होते. दरम्यान फिर्यादीची मोटरसयकल स्लिप झाल्याने दोघेही मोटरसायकलसह खाली पडले असता एमएच– 40/एएम– 2381 क्रमांकाचा ट्रॅक्टरचा चालक आरोपी नामे– कैलास राऊत, रा. खुर्सापार याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फुलचंद बोटरे यांच्या पाटीवरून समोरचे चाक घासत पुढे नेले व पळुन गेला. या अपघातात फिर्यादींचे वडील हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचाराकामी प्राथमीक आरोग्य केंद्र बेला येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. राहुल ठेंगणे हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 08 कि.मी. अंतरावरील मौजा उमरेड ते नागपूर रोड उदासा गावाजवळ इंडीयन ऑईल पेट्रोल पंप जवळ येथे दिनांक 15/06/2020 चे 13:00 वा. दरम्यान एमएच– 49/ यु– 8396 क्रमांकाचा बलेनो कारचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच– 40/एपी– 7059 क्रमांकाच्या डिस्कवर मोटरसायकला समोरून धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– सचिन रतीराम पेलने, वय 26 वर्ष, रा. आमगाव ता. पवनी जि. भंडारा हा जखमी झाल्याने त्यास उपचाराकामी प्रथम ग्रामीण रूग्णालय उमरेड व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा मारोती राउत यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रफुल माहुरे हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. काटोल – दिनांक 09/06/19 चे 10.00 वा. ते दिनांक 10/06/19 चे 04.00 वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे– तिलक राजकुमार हाटे, रा. काटोल याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 363, 366 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि राहुल बोंद्रे 9823904141 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर